झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय
बी.एस.एन.एल. बिल्डिंग, १ ला मजला, शिवाजीनगर
पोस्ट ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
झोपुप्रा/सप्रा-२/फा.प्लॉ.नं.३४० भांबुर्डा/ ७५५/२०१९
दिनांक :- १६/ ०८/२०१९

## झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे '**उक्त अधिनियम**' असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे.सुयश व्हेंचर्स यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना सदर योजनेची पात्रता यादी (परिशिष्ट-२) तयार करणेचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याप्रमाणे सदर झोपडपट्टीमधील ७०% पेक्षा जास्त झोपडीधारकांनी पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली असून त्यांची पात्रता निश्चित करणेची कार्यवाही या कार्यालयामार्फत करणेत येणार आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती दि.१६/०८/१९७३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये घोषित असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबददल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे, किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि**

**त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यांनतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील", असे नमूद केले आहे.**

आणि ज्याअर्थी, दि.०७/०३/२०१९ ची नोटीस स्थानिक वर्तमानपत्रात तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्दीकरिता देणेत येवून खालील अनुसुचीमध्ये निर्दिष्ठ क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती, संस्था यांना त्यांच्या ज्या काही सुचना/हरकती असतील त्या ३० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२ यांचेकडे सादर करण्यास फर्मावियात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नोटीसीस अनुसरुन उपरोक्त मिळकत सामाजिक कल्याण विभाग (सोशल वेलफेअर डिपार्टमेंट) यांच्या मालकीची असून सामाजिक कल्याण विभाग अथवा अन्य कोणाचीही सदर जाहिर नोटीसीस कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झालेली नाही.

त्या अर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालील अनुसुचीत नमूद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ४ आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत कान्हेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०००५१ यांचेकडील अपील दाखल करता येईल आणि उक्त अपीलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहिल.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं.९५७, फा.प्लॉ.नं.३४०, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे | ५२००.१९ चौ. मी. (दाखल प्रस्तावानुसार) | पुर्वेस - रस्ता |
| | | पश्चिमेस - हेल्थ कॅम्पची हद्द |
| | | उत्तरेस - फा.प्लॉ.नं.३८६ |
| | | दक्षिणेस - हेल्थ कॅम्प व फा.प्लॉ.नं.३३९ |

सदरचा आदेश माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

16.9.2019

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक - /०९/२०१९
१६/०९/२०१९.